कन्हाळगाव अभयारण्याचा प्रस्ताव रद्द करण्याची आ. सुधीर मुनगंटीवार यांची आग्रही मागणी; मुख्यमंत्र्यांचे वनसचिवांना कार्यवाहीचे निर्देश!

वर्षा निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेत ४७ गावांतील ग्रामस्थांची आ.मुनगंटीवार यांनी बाजू मांडली; निवेदनाची मुख्यमंत्र्यांकडून सकारात्मक दखल

आदिवासींचे जल, जंगल, जमिनीचे हक्क, स्थानिकांचा रोजगार आणि सुरक्षिततेचा प्रश्न उपस्थित; ग्रामस्थांच्या इच्छेविरुद्ध अभयारण्य लादू देणार नसल्याची आ. मुनगंटीवार यांची ठाम भूमिका

मुंबई - चंद्रपूर जिल्ह्यातील कन्हाळगाव अभयारण्य परिसरातील ४७ गावांचे भवितव्य आणि हजारो कुटुंबांच्या उपजीविकेचा प्रश्न ऐरणीवर आला असताना ग्रामस्थांच्या पाठीशी ठामपणे उभे राहत माजी वनमंत्री आमदार सुधीर मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांची मुंबईतील वर्षा शासकीय निवासस्थानी भेट घेतली. कन्हाळगाव अभयारण्याच्या प्रस्तावामुळे आदिवासी बांधवांचे पारंपरिक हक्क, स्थानिकांचा रोजगार आणि सुरक्षितता बाधित होण्याची शक्यता लक्षात घेता हा प्रस्ताव रद्द करावा, अशी आग्रही मागणी त्यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली. मुख्यमंत्र्यांनी या मागणीची सकारात्मक दखल घेत वनविभागाच्या सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले.

कन्हाळगाव अभयारण्याचे प्रस्तावित क्षेत्र सुमारे २५,१३८.१४६ हेक्टर असून, गोंडपिपरी तालुक्यातील ३९, पोंभुर्णा तालुक्यातील ५ आणि बल्लारपूर तालुक्यातील ३ अशा एकूण ४७ गावांचा या प्रस्तावाशी संबंध येतो. या परिसरातील मोठ्या वनक्षेत्राचा ताबा सध्या वनविकास महामंडळाकडे असून, महामंडळाच्या माध्यमातून हजारो स्थानिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतात. मात्र, अभयारण्याची निर्मिती झाल्यास कोअर आणि बफर क्षेत्रातील गावांवर विविध निर्बंध येण्याची, वनाधारित रोजगाराच्या संधी कमी होण्याची आणि पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे. विशेषतः आदिवासी बांधवांच्या पारंपरिक जीवनशैलीवर आणि जंगलाशी

असलेल्या त्यांच्या नैसर्गिक नात्यावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता आ. मुनगंटीवार यांनी मुख्यमंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली.

ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील पुनर्वसित गावांमधील नागरिकांना आजही विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत नव्या अभयारण्याच्या निर्मितीमुळे स्थानिकांना पुन्हा विस्थापन, निर्बंध आणि रोजगाराच्या प्रश्नांना सामोरे जावे लागू नये, अशी ग्रामस्थांची भूमिका आहे. चंद्रपूर जिल्ह्यात ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून व्याघ्र संवर्धनाचे मोठे काम सुरू असताना आणखी एका अभयारण्याची आवश्यकता काय, असा प्रश्नही आ.मुनगंटीवार यांनी उपस्थित केला.

यासोबतच जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यांमुळे होणारी मनुष्यहानी आणि जंगलालगतच्या गावांमधील नागरिकांच्या सुरक्षिततेचा गंभीर प्रश्नही आ. मुनगंटीवार यांनी मांडला. वन्यजीव संवर्धनाबरोबरच जंगलाच्या सान्निध्यात राहणाऱ्या नागरिकांच्या जीविताचे संरक्षण आणि सुरक्षिततेची हमी देणे तितकेच आवश्यक आहे. अभयारण्याच्या निर्मितीमुळे वन्यजीव आणि मानवी वस्त्यांमधील संघर्ष वाढण्याची भीती स्थानिकांमध्ये आहे. त्यामुळे संवर्धनाच्या धोरणात स्थानिक जनतेचे हित, त्यांच्या भावना आणि त्यांच्या जगण्याचे वास्तव यांना केंद्रस्थानी ठेवले पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

विशेष म्हणजे, आ. सुधीर मुनगंटीवार वनमंत्री असताना कन्हाळगाव अभयारण्यासंदर्भातील प्रस्ताव थांबविण्यात आला होता. आता पुन्हा ग्रामस्थ आणि सरपंच संघटनेचा विरोध समोर आल्यानंतर त्यांनी या विषयात पुढाकार घेतला आहे. यापूर्वी सरपंच संघटनेची भूमिका जाणून घेत त्यांनी वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत दृश्यप्रणालीद्वारे बैठक घेतली होती. या बैठकीत ४७ गावांतील नागरिकांच्या भावना, वनाधारित रोजगार, आदिवासींचे पारंपरिक हक्क, पुनर्वसन आणि मानवी-वन्यजीव संघर्षाचे प्रश्न सविस्तरपणे मांडण्यात आले होते. या सर्व बाबींचा संदर्भ घेत त्यांनी आता थेट मुख्यमंत्र्यांची भेट घेऊन ग्रामस्थांची बाजू शासनाच्या सर्वोच्च स्तरावर मांडली.

मुंबई येथील वर्षा शासकीय निवासस्थानी मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्यासोबत झालेल्या भेटीदरम्यान आ. मुनगंटीवार यांनी ग्रामस्थांना विश्वासात घेतल्याशिवाय अभयारण्यासंदर्भात कोणताही निर्णय घेऊ नये, अशी आग्रही भूमिका मांडली. संबंधित प्रस्तावाच्या प्रशासकीय प्रक्रियेतील सर्व बाबी तपासून स्थानिकांच्या हरकती आणि सूचनांचा गांभीर्याने विचार करावा, अशी मागणीही त्यांनी केली.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी निवेदनाची सकारात्मक दखल घेत वनविभागाच्या सचिवांना आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. त्यामुळे कन्हाळगाव अभयारण्याचा प्रश्न आता शासनाच्या सर्वोच्च स्तरावर पोहोचला असून, ४७ गावांतील ग्रामस्थांच्या मागण्यांच्या अनुषंगाने पुढील प्रशासकीय कार्यवाहीकडे लक्ष लागले आहे.

सरपंच संघटनेचे अध्यक्ष देविदास सातपुते आणि ग्रामस्थ यांच्या सोबत झालेल्या बैठकीत ग्रामस्थांची भूमिका स्पष्ट केली होती. सर्व सरपंच आणि गावकरी या प्रश्नावर एकजुटीने असून, स्थानिकांवर अन्याय होऊ नये आणि त्यांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे, यासाठी आ. सुधीर मुनगंटीवार यांनी पुढाकार घेऊन शासनदरबारी त्यांची बाजू मांडावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली होती.

जंगलाचे संवर्धन महत्त्वाचे आहेच; परंतु त्या जंगलाशी पिढ्यान्पिढ्या ऋणानुबंध जपणाऱ्या माणसांचे जगणे, त्यांचे हक्क आणि त्यांचे भविष्यही तितकेच महत्त्वाचे आहे. वन्यजीवांचे संरक्षण करताना स्थानिकांच्या अस्तित्वाची किंमत मोजावी लागू नये. ४७ गावांतील ग्रामस्थांच्या भावना, आदिवासी बांधवांचे पारंपरिक हक्क आणि त्यांच्या पुढील पिढ्यांचे भविष्य यासाठी आपण ठामपणे उभे राहू. ग्रामस्थांना विश्वासात घेतल्याशिवाय त्यांच्या इच्छेविरुद्ध हा प्रस्ताव पुढे जाऊ देणार नाही, अशी ग्वाही आ. सुधीर मुनगंटीवार यांनी दिली आहे.

सुधीर मुनगंटीवार
माजी मंत्री
विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

वंदे मातरम् १५०
वंद मंगळून अम्हा वंदे मातरम्

मा.कृ.1368 /नोव्हेंबर/2026

07/11/2026

सचिव
यांनी
कार्यवाही
करावी

प्रती,
मा.ना.श्री. देवेंद्रजी फडणवीस,
मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य,
मंत्रालय, मुंबई.

वंदे मातरम् !

विषय: चंद्रपूर जिल्ह्यातील प्रस्तावित कन्हाळगाव वन्यजीव अभयारण्याचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत.

महोदय,

चंद्रपूर जिल्ह्यातील प्रस्तावित कन्हाळगाव वन्यजीव अभयारण्याच्या निर्मितीचा विषय सध्या स्थानिक नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाचा व संवेदनशील बनला आहे. सदर अभयारण्याचे प्रस्तावित क्षेत्र सुमारे 25,138.146 हेक्टर असून, गोंडपिपरी तालुक्यातील 39, पोंभुर्णा तालुक्यातील 5 आणि बल्लारपूर तालुक्यातील 3 अशा एकूण 47 गावांतील नागरिकांच्या जीवनावर या निर्णयाचा थेट परिणाम होणार आहे.

या प्रस्तावाला संबंधित गावांतील ग्रामस्थांचा व सरपंच संघटनेचा तीव्र विरोध असून, अनेक ग्रामपंचायतींनी यापूर्वीच अभयारण्यास विरोध करणारे ठराव शासनाकडे सादर केलेले आहेत. नुकतीच सरपंच संघटनेच्या प्रतिनिधींसोबत तसेच वनविभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत झालेल्या बैठकीत स्थानिक नागरिकांनी त्यांच्या विविध समस्या व आक्षेप मांडले आहेत.

या परिसरातील मोठ्या वनक्षेत्राचे व्यवस्थापन सध्या महाराष्ट्र वन विकास महामंडळाकडे (FDCM) असून, महामंडळाच्या माध्यमातून हजारो स्थानिक नागरिकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. मात्र, प्रस्तावित अभयारण्यामुळे कोअर व बफर क्षेत्रातील गावांवर विविध निर्बंध येण्याची, वनाधारित रोजगाराच्या संधी कमी होण्याची तसेच स्थानिकांच्या पारंपरिक उपजीविकेवर परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

या परिसरातील आदिवासी बांधवांचे जंगलाशी पिढ्यान्‌पिढ्यांचे नाते आहे. त्यांची पारंपरिक जीवनशैली, वनसंपत्तीवर जल, जंगल, जमिनीवरील पारंपरिक हक्क यांचे संरक्षण होणे अत्यंत आवश्यक आहे. अभयारण्याच्या निर्मितीमुळे त्यांच्या मूलभूत हक्कांवर व जीवनमानावर मर्यादा येणार नाहीत, याची शासनाने काळजी घेणे गरजेचे आहे.

यासोबतच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या परिसरातील पुनर्वसित गावांमधील नागरिकांना आजही विविध समस्यांना सामोरे जावे लागत आहे. अशा परिस्थितीत नव्याने अभयारण्य निर्माण झाल्यास स्थानिक नागरिकांना पुन्हा विस्थापन, रोजगाराच्या समस्या आणि विविध निर्बंधांचा सामना करावा लागण्याची भीती आहे. चंद्रपूर जिल्ह्यात यापूर्वीच ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पाच्या माध्यमातून वन्यजीव संवर्धनाचे मोठे काम सुरू असताना आणखी एका अभयारण्याची आवश्यकता व त्यातून स्थानिकांना होणारे फायदे यांचाही वस्तुनिष्ठ विचार होणे आवश्यक आहे.

तसेच चंद्रपूर जिल्ह्यात वाघांच्या हल्ल्यांमुळे मनुष्यहानीच्या घटना घडत असताना जंगलालगत राहणाऱ्या नागरिकांच्या जीवितास संरक्षण व सुरक्षिततेची हमी देणे हीदेखील शासनाची महत्त्वाची जबाबदारी आहे. वन्यजीव संवर्धनासोबतच मानव-वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे.

पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत
दुरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४
+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com
@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com

सुधीर मुनगंटीवार

माजी मंत्री

विधानसभा सदस्य, महाराष्ट्र

वंदे मातरम् १५०

वंदे मातरम् ... आपका और मेरा वंदे मातरम्

मी वनमंत्री असताना कन्हारगाव अभयारण्यासंदर्भातील प्रस्ताव थांबविला होता. आता पुन्हा स्थानिक ग्रामस्थ आणि सरपंच संघटनेचा विरोध समोर आला असून, या परिसरातील नागरिकांच्या भावना व त्यांच्या हक्कांचा विचार करूनच पुढील निर्णय घेणे आवश्यक आहे.

त्यामुळे आपणास विनंती आहे की,

1. स्थानिक ग्रामस्थांचा व संबंधित ग्रामपंचायतींचा विरोध लक्षात घेता प्रस्तावित कन्हारगाव वन्यजीव अभयारण्याचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत शासनाने सकारात्मक निर्णय घ्यावा.
2. या परिसरातील आदिवासी बांधवांचे पारंपरिक वनहक्क, जल, जंगल, जमिनीवरील हक्क आणि स्थानिक नागरिकांच्या उपजीविकेचे संरक्षण करण्यात यावे.
3. महाराष्ट्र वन विकास महामंडळाच्या माध्यमातून उपलब्ध होत असलेल्या स्थानिक रोजगाराच्या संधी अबाधित राहतील, याची दक्षता घ्यावी.
4. या विषयाचे गांभीर्य लक्षात घेता, दिनांक 17 नोव्हेंबर ते 19 नोव्हेंबर 2026 या कालावधीत आपल्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात यावी. या बैठकीस, वनविभागाचे वरिष्ठ अधिकारी, वनविकास महामंडळाचे अधिकारी, सरपंच संघटनेचे प्रतिनिधी तसेच संबंधित गावांचे लोकप्रतिनिधी यांना निमंत्रित करण्यात यावे, जेणेकरून स्थानिक नागरिकांच्या सर्व समस्या व हरकतींवर सविस्तर चर्चा करून योग्य निर्णय घेता येईल.

माझी भूमिका स्पष्ट आहे की, वन्यजीव संवर्धनाला विरोध नसून स्थानिक ग्रामस्थांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या हक्कांवर आणि रोजगारावर परिणाम करणारे अभयारण्य लादणे योग्य ठरणार नाही. ग्रामस्थांना विश्वासात घेतल्याशिवाय त्यांच्या इच्छेविरुद्ध हा प्रस्ताव पुढे जाऊ नये.

त्यामुळे 47 गावांतील नागरिकांच्या भावना, आदिवासी बांधवांचे हक्क, स्थानिक रोजगार आणि सुरक्षितता यांचा विचार करून कन्हारगाव अभयारण्याचा प्रस्ताव रद्द करण्याबाबत आपण तातडीने निर्णय घेणे आवश्यक आहे. त्याकरीता **दिनांक 17 नोव्हेंबर ते 19 नोव्हेंबर** या दरम्याण आपल्या अध्यक्षते खाली बैठकीचे आयोजीत करण्यास विनंती आहे. कृपया बैठकीच्या निश्चिती संदर्भात मला अवगत करण्यस विनंती आहे.

धन्यवाद.

आपला

(सुधीर मुनगंटीवार)

प्रत :

1. मा. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख महाराष्ट्र राज्य).
2. मा. व्यवस्थापकीय संचालक वनविकास महामंडळ महाराष्ट्र राज्य नागपूर.
3. श्री. बंडू गौरकार सदस्य महाराष्ट्र राज्य कृषीमूल्य आयोग मुंबई
4. श्री. देवीदास सातपुते संरपच ग्रामपंचायत पोडसा ता.गोंडपिपरी जि.चंद्रपूर

पत्ता : भाग्यश्री गोल बाजार वार्ड, चंद्रपूर-४४२ ४०२, महाराष्ट्र, भारत

दूरध्वनी (कार्या.) ०७१७२-२५२५८२, (निवास) ०७१७२-२७३९०० (मो.) +९१-७७२२०७४१९९, प्रसाद उकीर्डे (PA) - +९१-९९७५२३४३४४

+91-7722074199 SudhirMungantiwar Sudhir.Mungantiwar https://sudhirmungantiwar.com

@SMungantiwar @SudhirMungantiwar sudhirbhau.mungantiwar@gmail.com bjp03069@gmail.com